पुढारी




कोल्हापूर : युवा महोत्सवात सहभागी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. प्रकाश गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. तानाजी चौगुले. (छाया : पप्पू अत्तार)

# कला-संस्कृतीचा वारसा तरुणांनी वृद्धिंगत करावा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; युवा महोत्सवातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय कला, संस्कृतीचा वारसा वृद्धिंगत करणे ही तरुणांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने युवा पिढीने कार्यरत राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा, इंद्रधनुष्य युवा महोत्सव, पश्चिम विभागीय युवा महोत्सव, राष्ट्रीय युवा महोत्सव व आंतरराष्ट्रीय युवा महोत्सव आदींमध्ये पदकांसह यशप्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनींचा गौरव समारंभात ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी विविध युवा महोत्सवांमध्ये वर्चस्व सातत्याने टिकवून ठेवले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात कारकीर्द घडवावयाची असली, तरी लक्ष्य इतके उंच ठेवावे की, त्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला पाहिजे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. युवा महोत्सवात सहभागी २३ विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या संघ व्यवस्थापक शीला मोहिते, भाग्यश्री कालेकर, तुकाराम शिंदे, संगीता पाटील, डॉ. एस.ए. महात, सुरेश मोरे यांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. तुकाराम शिंदे यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले प्रमुख उपस्थित होते.

सकाळ

# व्यवस्थापन परिषद सदस्यपदी आर. व्ही. गुरव यांची नियुक्ती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळाच्या सदस्यपदी प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव यांची नियुक्ती झाली. विभागप्रमुख गटातून त्यांची नियुक्ती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केली आहे. त्यांच्या सदस्यपदाचा कालावधी एक वर्षाचा आहे. या नियुक्तीचे पत्र त्यांना विद्यापीठ प्रशासनाकडून शुक्रवारी मिळाले. प्रा. गुरव सध्या विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी कार्यरत आहेत. अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदाची त्यांच्यावर जबाबदारी आहे. त्यांनी यापूर्वी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या समन्वयकपदाची जबाबदारी सांभाळली आहे.